# जाहीर आवाहन

## जिल्हा परिषद उपकर योजना सन २०२५-२६ योजनेतून कृषि औजारे

| अ.क्र. | औजाराचे नाव | देय अनुदान मर्यादा रक्कम प्रती नग रू. |
|---|---|---|
| १ | ५० HP पर्यंत ट्रॅक्टर | किंमतीच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू.१,००,०००/-च्या मर्यादेत (यापैकी जी कमी असेल ती) |
| २ | ट्रॅक्टरचलीत पेरणीयंत्र/पल्टीनांगर | किंमतीच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू.२०,०००/-च्या (यापैकी जी कमी असेल ती) |
| ३ | ट्रॅक्टरचलीत रोटाव्हेटर | किंमतीच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू.३५,०००/-च्या मर्यादेत मर्यादेत (यापैकी जी कमी असेल ती) |

१) वार्षिक उत्पन्न रु. १.५० लक्ष पेक्षा जास्त नसावे (तहसिलदार यांचे उत्पन्न प्रमाणपत्र बंधनकारक आहे.)
२) मागणी केलेल्या औजाराचा / यंत्राचा कुटुंबात यापूर्वी कोणत्याही शासकिय योजनेतुन लाभ घेतला नसल्याचे तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र.
३) मंजुर झालेले औजार/यंत्र डीबीटीद्वारे खरेदी करणे बंधनकारक आहे.
४) पूर्व संमती मिळाल्यापासून पूर्वसंमतीमध्ये दर्शविलेल्या कालावधीत औजार / यंत्र खरेदी करणे बंधनकारक राहील, विहित मुदतीत खरेदी न केल्यास पूर्व संमती रद्द होईल.
५) सदर अर्जाद्वारे तयार होणारी पात्रनिवड यादी दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत वैद्य राहील त्यानंतर आपोआप रद्द होईल.
६) केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी यंत्र / औजारे यांचे रीतसर (Testing) करून ते बीआयएस अथवा अन्य सक्षम संस्थानी निश्चित केलेले मानांकन (Standards) / तांत्रिक निकषानुसार असेल.
७) मंजुर झालेले औजार / यंत्र खुल्या बाजारातुन खरेदी करून त्याचे मुळ देयक (Tax invoice) व टेस्ट रिपोर्ट सादर करणे लाभार्थीस बंधनकारक राहील.
८) औजाराची खुल्या बाजारातुन खरेदी करताना बैंक खात्यातुन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (RTGS/NEFT/IMPS)धनादेश / धनाकर्ष विक्रेत्यास रककम अदा करणे लाभार्थीस बंधनकारक राहील.
९) औजार/यंत्र खुल्या बाजारातुन लाभार्थी स्वतःच्या पसंतीने खरेदी करणार असल्याने औजार / यंत्राच्या गुणवत्तेची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थींची राहील.
१०) सदर योजनेतील लाभार्थ्यांची निवड जिल्हास्तरावर सोडत (लक्की ड्रॉ) पद्धतीने केली जाईल.

**आवश्यक कागदपत्रे.**

१. लाभाथीचे नावे ७/१२ व ८ अ
२. उत्पन्न प्रमाणपत्र
३. आधार कार्ड
४. बँक पासबुक
५. दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र
६. अर्जदाराचे नावाचे ट्रॅक्टर RC BOOK (ट्रॅक्टर चलीत औजारांसाठी)

**अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक १६/०९/२०२५**

**अर्ज करावयाचे स्थळ : पंचायत समिती कार्यालय**

कृषि विभाग, जिल्हा परिषद जालना